प्रेसनोट

दिनांक ०८/०८/२०२३

**ठाणे - जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालयातील अव्वल कारकुन यांना लाच स्विकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :- | ठाणे |
| गुन्हा नोद कमांक | :- | ठाणेनगर पोलीस स्टेशन |
| लोक सेवकाचे नाव व कार्यालय | :- | लोकसेवक संतोष सुखदेव प्रधान, वय ५० वर्षे पद- अव्वल कारकुन, (वर्ग-३) जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | ५०००/- रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | २५००/- रूपये |
| थोडक्यात हकीकत | :- | यातील तक्रारदार यांचा राईसमिलचा व्यवसाय असून, ते महाराष्ट्र राज्य, सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, जव्हार, जि. पालघर यांचा करारबध्द मिलर्स आहे. नमुद महामंडळाकडून येणारा धान गिरणीमध्ये नेऊन व भरडाई करुन तयार झालेला तांदूळ (सीएमआर) शासकिय गोदामांमध्ये जमा करण्यात येतो. त्याप्रमाणे तक्रारदार व मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे यांचेमध्ये करारनामा झालेला आहे. कराराप्रमाणे भात शहापूर येथील शासकिय गोदामातून आणून त्याची भरडाई करुन तयार तांदूळ पुन्हा शासकिय गोदामाध्ये जमा करण्यात येतो. परंतु भरडाई करुन तयार तांदुळ शासकिय गोदामाध्ये जमा करण्यापूर्वी सदर तांदळाचे नमुने जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे कार्यालयातील संबंधित अधिकारी श्री. प्रधान हे तपासणीकरीता नमुना घेऊन जातात व तपासणी करुन त्याबाबत कळवितात. त्याप्रमाणे जिल्हा पुरवठा कार्यालयातील श्री. प्रधान यांनी दि. ३१/०७/२०२३ रोजी तक्रारदार यांचे मिलमध्ये भरडलेल्या शासकिय भातामधील तांदळाचे नमुन्यास मंजुरी देण्याकरीता त्यांच्याकडे ५०००/- रु. रक्कमेची लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी त्यांचे विरूध्द कारवाई करण्याकरिता अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. ३१/०७/२०२३ लेखी तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०१/०८/२०२३ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये यातील लोकसेवक संतोष प्रधान यांनी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे काम पुर्ण करण्यासाठी ५०००/-रू लाचेची मागणी करून स्विकारण्याचे प्रलंबित ठेवले. त्याअनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंध विभाग, ठाणे विभागाने दि. ०८/०८/२०२३ रोजी सापळ्याचे आयोजन करून लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडुन २५००/-रु. स्विकारताना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे १२.५० वा. रंगेहात पकडयात आले आहे. सदर बाबत गुन्हा नोंदविण्याची कारवाई सुरू आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी - १. मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्त्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ- acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन - acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर- १०६४
दुरध्वनी कमांक - ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप् कमांक - ९९३०९९७७००

मा. सविनय सादर

(हणमंत क्षिरसागर)
पोलीस निरीक्षक,
**अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.**

पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे